वाचले –

१) मा.आयुक्तसो. यांचेकडील आदेश क्र.बप्र/४अ/कावि/३८१/१३, दि.२१/८/२०१३

२) कारणे दाखवा नोटीस क्र.बप्र/४/कावि/४८५/१३, दि.८/१०/२०१३

३) श्रीम.कोळपकर, मिटर निरीक्षक यांचा दि.२२/१०/२०१३ रोजीचा खुलासा

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ब प्रभाग कार्यालय,चिंचलड-३३
क्र.बप्र/११/कावि/५६९/२०१३
दिनांकः- १८/११/२०१३

**विषय – <u>सक्त ताकीद देणेबाबत</u>**
श्रीम.कुदा ज्ञानेश्वर कोळपकर, मिटर निरीक्षक, ब-प्रभाग

**आदेश,**

आपली राज्यातील नागरी भागात अनाधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलनासाठी उपाययोजना कामकाजासाठी मा.आयुक्तसो यांचेकडील वाचले क्र.१ चे आदेशान्वये वॉर्ड क्र.४३अ, जिजामाता हॉस्पीटल येथे बीट निरीक्षक म्हणून नेमणूक करणेत आलेली आहे व तसा आदेश आपणास दि.३१/०८/२०१३ रोजी बजाविणेत आलेला आहे.

परंतु दिलेल्या आदेशानुसार आपण बीट निरीक्षकांचे कामकाज करणेकामी टाळाटाळ करीत आहात. आपणास वारंवार केलेल्या कामकाजाचा साप्ताहिक अहवाल मागितला असाताना सुध्दा आपण आजतागायत अहवाल दिलेला नाही. आपल्या ह्या निष्काळजीपणामुळेच आपणास वाचले क्र.२ अन्वये नोटीस देणेत आली होती व दोन दिवसात खुलासा करणेकामी कळविले होते. परंतु आपण दि.२२/१०/२०१३ रोजी म्हणजेच १२ दिवस उशीरा लेखी खुलासा सादर केला आहे व सदर खुलाशासोबत वाय.सी.एम.हॉस्पीटलकडील दि.१४/१०/२०१३ ते दि.२१/१०/२०१३ अखेर ८ दिवसाचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर केले आहे. परंतु आपली नेमणूक दि.२१/८/२०१३ पासूनची असल्याने दि.१४/१०/२०१३ अखेरचा कामकाजाचा अहवाल सादर करणे आवश्यक होते. परंतु आपण अद्यापपर्यंत एकही अहवाल सादर केलेला नाही. त्यामुळे आपणास नेमून दिलेल्या वॉर्डातील अनाधिकृत बांधकामाचा तपशिल समजलेला नाही व त्यास प्रतिबंधही करता आलेला नाही. त्यामुळे आपण केलेला खुलासा असमाधानकारक व कर्तव्याशी विसंगत आहे.

सबब बीट निरीक्षक म्हणून कामकाज करताना मा.आयुक्तसो. यांचेकडील आदेश क्रमांक दवनि/६/कावि/१६/२०१३, दिनांक ११/७/२०१३ मधील पानांक ३ वरील बीट निरीक्षकांची जबाबदारी व कर्तव्यात कसूर केल्याबद्दल आपणास सक्त ताकीद देण्यात येत आहे. आपण भविष्यात आपल्या जबाबदा-या व कर्तव्य पार पाडताना सचोटी व कर्तव्यपालनामध्ये कसूर केल्यास कडक शास्ती करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**प्रभाग अधिकारी (ब-प्रभाग)**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
चिंचवड – ४११०३३.

प्रति,
श्रीम.कुंदा ज्ञानेश्वर कोळपकर,
मीटर निरीक्षक, ब-प्रभाग,
बीट निरीक्षक, प्रभाग क्र.४३अ,
जिजामाता हॉस्पीटल.

प्रत – प्रशासन विभाग, ब-प्रभाग कार्यालय